# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. प्रअचौ/मुख्यालय/सर्वसा/६५०
दि. १५.२.२०१८

विषय:- रस्ते दुरूस्ती/पुनर्बांधणी (विकास कामे) इ. कामात आढळून आलेल्या अनियमितता प्रकरणी टप्पा-2(Phase-II)मध्ये करण्यात येत असलेल्या चौकशीचा अहवाल.

संदर्भ:- (1) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे दि.16.10.2015 चे क्र.एमजीसी/एम/8364 अन्वयेचे आदेश.
(2) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे दि.19.10.2015 चे क्र.एमजीसी/एफ/8364 अन्वयेचे आदेश.
(3) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे दि.25.04.2016 चे क्र.एमजीसी/एफ/9896 अन्वयेचे आदेश.
(4) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे दि.09.06.2017 चे क्र.एमजीसी/एफ/2140 अन्वयेचे आदेश.
(5) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे दि.13.11.2017 चे क्र.एमजीसी/ए/319 अन्वयेचे आदेश. (पृ.प-1)
(6) मा.महानगरपालिका आयुक्त यांचे दि.08.02.2018 चे क्र.एमजीसी/एफ/5328 अन्वयेचे आदेश.(पृ.टि-20, नस्ती क्र.IV )

-------

विषयांकित प्रकरणी कृपया मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या उपरोक्त संदर्भाधीन आदेशांचे अवलोकन व्हावे.

मा.महानगरपालिका आयुक्त यांनी उपरोक्त संदर्भ क्र.1 व 2 येथील आदेशान्वये प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी मा.अतिरिक्त आयुक्त (प.उप.) यांच्या अंतर्गत तत्कालीन उप आयुक्त (परि-तीन) व तत्कालीन प्रमुख अभियंता (दक्षता) अशा द्विसदस्यीय चौकशी समितीची नेमणूक केली होती.

या समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मा.महानगरपालिका आयुक्त यांनी श्री. बांबळे, उप आयुक्त (वि.अ.) यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती.

सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर प्रमुख अभियंता (दक्षता) खात्यातील एकूण 23

कर्मचाऱ्यांची निवेदने नोंदवून द्विसदस्यीय समितीने सादर केलेला डेटा(Trial Pits Inspection Report, Layerwise Shortfall and Excavation and Transportation Shortfall) अभिलेखीत करण्यात आला. त्यानंतर प्रमुख अभियंता (रस्ते) यांच्याकडून या रस्त्यांशी संबंधित कर्मचाऱ्यांचा तपशील प्राप्त करून घेण्यात आला. प्राप्त झालेल्या या तपशीलाच्या आधारे टप्पा-1(Phase-I) अंतर्गत संबंधित असलेल्या एकूण 100 अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांवर रोडनिहाय 248 दोषारोपपत्रे बजाविण्यात आली व याबाबतचा अंतिम अहवाल मा.महानगरपालिका आयुक्त यांना दि.03.01.2018 रोजी क्र.प्रअचौ/मुख्यालय/जन/530 अन्वये सादर करण्यात आला. या अहवालाच्या अनुषंगाने मा.महानगरपालिका आयुक्त यांनी दि.06.01.2018 रोजी क्र.एमजीसी/एफ/5338 अन्वये चौकशी अहवालास मान्यता देऊन शिक्षादेश पारित केलेले आहेत. या शिक्षादेशानुसार त्यांच्या अंमलबजावणीची कार्यवाही स्वतंत्रपणे सुरू आहे.

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या उपरोक्त संदर्भ क्र.4 येथील आदेशानुसार टप्पा-2(Phase-II) अंतर्गत एकूण 169 अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांवर रोडनिहाय 699 दोषारोपपत्रे बजाविण्यात आली. या संबंधात या खात्याकडे उपलब्ध असलेला कागदोपत्री पुरावा टप्प्याटप्प्याने संबंधित कर्मचाऱ्यांना पडताळणीसाठी उपलब्ध करून देण्यात आला. त्याचवेळी या कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्याची सोय 'के/पूर्व' विभाग कार्यालयात करण्यात आली. त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांनी आवश्यकतेनुसार कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्राप्त करून घेतल्या. त्यानंतर सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी दोषारोपपत्रांच्या अनुषंगाने त्यांची अभिवेदने सादर केली व त्याची छाननी करून कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या बचावाच्या संदर्भात या कार्यालयाचे अभिप्राय नोंदविण्यात आले.

मा. महानगरपालिका आयुक्त यांनी उपरोक्त संदर्भ क्र.5 अन्वये रस्ते दुरूस्ती/पुनर्बांधणी (विकास कामे) इ. कामात आढळून आलेल्या अनियमितता प्रकरणी टप्पा-2(Phase-II) मध्ये करण्यात येत असलेल्या चौकशीचा अहवाल सादर करण्यासाठी दि.31.01.2018 ही कालमर्यादा विहित करून देण्यात आली होती. तथापि, टप्पा-2(Phase-II) मध्ये अंतर्भुत असलेल्या रस्त्यांची संख्या व जबाबदारी निश्चित करण्यात यावयाच्या कर्मचाऱ्यांची संख्या हा कामाचा आवाका विचारात घेऊन मा.महानगरपालिका आयुक्त यांनी दि.08.02.2018 क्र.एमजीसी/एफ/5328 अन्वये टप्पा-2(Phase-II) चा अहवाल सादर करण्यासाठी दि.14.02.2018 पर्यंत कालमर्यादा वाढवून दिली. त्यानुसार

खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे:-

- टप्पा-2(Phase-II) मध्ये अंतर्भुत असलेल्या 200 रस्त्यांच्या नावाची यादी सोबतच्या **परिशिष्ट`अ`** मध्ये सादर करण्यात आली आहे.(प-3 ते प-8)
- या टप्प्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामाशी संबंधित असलेल्या अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांची यादी **परिशिष्ट`ब`** मध्ये सादर करण्यात आली आहे.(प-9 ते प-12) या यादीत उप प्रमुख अभियंता, कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता व दुय्यम अभियंता या श्रेणीतील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या संबंधित कर्मचाऱ्यांची यादी प्रमुख अभियंता (रस्ते) विभागाने चौकशीसाठी उपलब्ध करून दिली होती.
- टप्पा-2(Phase-II) मध्ये प्रमुख अभियंता (रस्ते) विभागाने त्यांच्या कार्यालयातील अभिलेखानुसार या कामाशी संबंधित असलेल्या एकूण 173 अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांची नावे या कार्यालयाकडे सादर केली होती. त्यापैकी श्री.एम.डी. माचिवाल, उप प्रमुख अभियंता (रस्ते) व श्री.एस.एन.जाधव, कार्यकारी अभियंता (रस्ते) या कर्मचाऱ्यांचा कालावधी त्या कामाशी संबंधित नव्हता, असे टप्पा-1(Phase-I) मधील छाननीच्यावेळी निदर्शनास आले होते. त्यामुळे हे दोन कर्मचारी वगळून उर्वरित कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्र बजावयाची होती.
- दोषारोपपत्रे बजाविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचे बचावाचे निवेदन/अभिवेदन सादर करण्यासाठी चौकशी कार्यालयाकडे प्राप्त झालेला अभिलेख पडताळणीकरिता उपलब्ध करून देण्यात आला व त्याचवेळी त्याच्या छायांकित प्रती प्राप्त करून घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या कागदोपत्री पुराव्याच्या एकंदर अंदाजे 4.5 लाख छायांकित प्रती देण्यात आल्या.
- श्री. एम.व्ही.सावंत, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) वगळता उर्वरित सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांची बचावाची अभिवेदने सादर केलेली असून, त्यांची छाननी करण्यात आली.
- श्री.एम.व्ही.सावंत, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांच्यावर बजाविण्यात आलेल्या दोषारोपपत्रातील ज्ञापान्वये त्यांनी दोषारोपपत्र प्राप्त झल्यापासून 10 दिवसांच्या आत बचावाचे अभिवेदन सादर न केल्यास त्यांना बचावार्थ काहीही सादर करावयाचे नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशा सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार दोषारोपपत्र

प्राप्त होऊनही श्री.सावंत यांनी विहित मुदतीनंतर देखील दोषारोपपत्रास उत्तर सादर न केल्याने त्यांना बचावाचे अभिवेदन सादर करावयाचे नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

- कर्मचाऱ्यांवर ठेवण्यात आलेले आरोप, त्या अनुषंगाने त्यांनी बचावात मांडलेले मुद्दे व त्यावरील अभिप्राय असा तपशील अंतर्भुत असलेले तक्ते सोबत सादर करण्यात येत आहेत. (**4 बॉक्स फाईल**)
- टप्पा-2(Phase-II) मधील आरोपित कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या अभिवेदनांची छाननी केल्यानंतर काही मुद्दे सामायिक असल्याचे निदर्शनास आले आहे. असे सामायिक मुद्दे व त्यावरील या खात्याचे अभिप्राय हा तपशील सोबतच्या **परिशिष्ट`क`** मध्ये अवलोकनार्थ सादर करण्यात आला आहे. (प-13 ते प-15)
- आरोपित कर्मचाऱ्यांनी सादर केलेले अभिवेदन व त्यावरील अभिप्राय याच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांवर ठेवण्यात आलेले किती आरोप सिध्द होतात, त्यांनी सादर केलेली निवेदने व कागदोपत्री पुरावे या आधारे निदर्शनास आलेले उपशामक घटक, कर्मचाऱ्याचा निवृत्तीचा दिनांक हा तपशील दर्शविणारी विवरणपत्रे सोबतच्या **नस्ती क्र.III** मध्ये सादर करण्यात आली आहेत.

प्रस्तुत प्रकरणी कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्र बजाविल्यावर त्या अनुषंगाने त्यांची अभिवेदने प्राप्त झालेली आहेत. सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर ठेवण्यात आलेले सर्व आरोप अमान्य केलेले आहेत. या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बचावाच्या निवेदनांच्या अनुषंगाने जे मुद्दे अभिलेखित होतात, त्यांचा विचार करता, त्यांच्यावर ठेवलेल्या आरोपांमध्ये तथ्य आढळते, असा निष्कर्ष आहे.

या प्रकरणी बजाविण्यात आलेल्या आरोपपत्रांच्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेली अभिवेदने, STAC चा अहवाल, कंत्राटातील अटी व शर्ती या सर्वांचा विचार करता असे निदर्शनास आले आहे की, संबंधित कालावधीत रस्त्याची हाती घेण्यात आलेल्या कामांची संख्या ज्या प्रमाणात होती त्या प्रमाणात पुरेसे अभियंता वर्गीय कर्मचारी उपलब्ध नसल्याने पर्यवेक्षणाच्या कामकाजात कर्मचाऱ्यांची कमतरता होती. त्यासाठी STAC ने शिफारस केल्यानुसार सदर रस्त्यांच्या दुरूस्तींच्या दैनंदिन पर्यवेक्षणाच्या मदतीसाठी PMA ची नियुक्ती केली गेली. या PMA नी सदर रस्ता

दुरुस्तीच्या प्रत्येक टप्प्यावर मोजमाप घेणे, रस्ता दुरुस्ती / पुनर्बांधणीच्या दर्जाची खात्री करणे, कंत्राटदार करित असलेले काम विहीत मानकांनुसार होत आहे की नाही यावर दैनंदिन पर्यवेक्षण ठेवणे याबाबत त्यांची जबाबदारी 100% होती. तथापि, PMA ही बाहेरील संस्था असल्याने महानगरपालिकेच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी महानगरपालिकेच्या अभियंता वर्गीय कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून PMA नी केलेल्या कामाची पडताळणी करणे अभिप्रेत होते व त्या प्रमाणात महानगरपालिका अभियंता वर्गीय कर्मचाऱ्यांचे या कामात उत्तरदायित्व आहे. या संदर्भात ज्या महानगरपालिका अभियंता वर्गीय कर्मचाऱ्यांकडून ज्या प्रमाणात हलगर्जीपणा दिसून आलेला आहे त्या कर्मचाऱ्यांना त्या-त्या प्रमाणात दोषी ठरवून त्यांना शिक्षा प्रदान करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी कर्मचाऱ्यांचे दोषाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी खालील नमूद केलेली कार्यपद्धती अवलंबिण्यात आली:-

- प्रमुख अभियंता (दक्षता) खात्याने Trial pit घेऊन Layer wise Shortfall दर्शविणारी विवरणपत्रे सादर केली होती. सदर विवरणपत्रांची छाननी केली असता Asphalt Road मध्ये GSB व WMM या थरांमध्ये मोठ्या प्रमाणावर Shortfall आढळून आले, तर DBM, BC व Mastic या थरातील Shortfall अल्प प्रमाणात होते. तसेच, CC Road मध्ये Sand Blanket, Metal, GSB व WMM या थरांमध्ये मोठ्या प्रमाणवर Shortfall आढळून आले, तर Sleeper slap, PQC, DBM व Mastic या थरातील Shortfall अल्प प्रमाणात होते. त्यामुळे या रस्त्यांबाबत GSB, WMM Sand Blanket व Metal हे थर विचारात घेण्यात आले.

- Shortfall ची वर्गवारी करण्याकरिता Shortfall 0% ते 100% या प्रमाणात कमी सापडले त्यांचे टक्केवारीनिहाय 6 गटात वर्गीकरण करण्यात आले व त्यांना Y, A, B, C, D व X अशा Grade देण्यात आल्या. याबाबतचा तपशील **परिशिष्ट - 'ड'** (पृष्ठ क्र.प-17) येथे दर्शविण्यात आला आहे.
- यानंतर प्रत्येक कर्मचारीनिहाय त्यांच्या अखत्यारितील रस्ते व त्यामध्ये आढळलेले Shortfall दर्शविणारी विवरणपत्रे तयार करुन वर नमूद केल्याप्रमाणे Gradation करण्यात आली. त्यानंतर कर्मचाऱ्याची दोषसिद्धी निश्चित करण्यासाठी या Gradation ना Responsibility Dereliction Quotient देण्यात आले (याबाबतचा तपशील **परिशिष्ट - 'ड'** (पृष्ठ क्र.प-17) येथे दर्शविण्यात आला आहे).

- प्रत्येक कर्मचारीनिहाय Responsibility Dereliction Quotient चे परिगणन करुन त्यांची बेरीज करण्यात आली. या बेरजेला त्या कर्मचाऱ्याच्या अखत्यारितील रस्त्यांच्या संख्येने भागण्यात आले व आलेली संख्या 0.01 ते 2.01 & above या Range मध्ये एकूण 8 टप्प्यांत विभागण्यात आली. त्यानंतर निश्चित झालेली संख्या कोणत्या टप्प्यात येते याची वर्गवारी करुन प्रत्येक टप्प्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली (याबाबतचा तपशील **परिशिष्ट 'ड'**(पृष्ठ क्र.प-17) येथे दर्शविण्यात आला आहे).
- प्रसंगवशात येथे असे नमूद करावयाचे आहे की, प्रस्तुत टप्पा-2(Phase-II) एकूण 169 अभियंतावर्गीय कर्मचाऱ्यांवर विविध रस्त्यांशी संबंधित 699 इतकी दोषारोपपत्र विहित कालमर्यादेत बजाविण्यात आली. हे काम सुरु असतानाच टप्पा-1(Phase-I) मधील प्राप्त अभिवेदनांच्या छाननीचे काम देखील सुरू होते. टप्पा-2(Phase-II) चा अहवाल अंतिम स्वरूपात सादर करतांना कर्मचारी संकेतांकनिहाय पडताळणी करतांना असे निदर्शनास आले की, टप्पा-2(Phase-II) मध्ये लिंकिंग रोड या रस्त्याशी संबंधित Trial Pit Calculation Sheet मध्ये हा रस्ता 'के/प' व 'एच/प' विभागाशी संबंधित असला तरीही त्याचा अहवाल वेगवेगळा दर्शविलेला नव्हता व फक्त 'के/प' च्या Trial Pit Calculation Sheet मध्ये एकत्रित दाखविला गेला होता. त्यामुळे व आडनाव साधर्म्यामुळे अनावधानाने 'एच/प' विभागाशी संबंधित श्री.ए.डी. गव्हाणे, दुय्यम अभियंता व श्री. आर.जी. जाधव, सहायक अभियंता यांना दोषारोपपत्र बजाविण्याचे राहून गेले. तसेच टप्पा-1(Phase-I) चा अहवाल सादर करतांना त्यात टप्पा-1(Phase-I) व टप्पा-2(Phase-II) मध्ये सामायिक असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या 82 अशी दर्शविण्यात आली होती. परंतु कर्मचारी संकेतांकानुसार पुन्हा पडताळणी करतांना ही संख्या 84 इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे. या 84 कर्मचाऱ्यांची यादी **परिशिष्ट 'ई'** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. (पृ.प-19 ते प-22)
- येथे असे निर्दशनास आणून द्यावयाचे आहे की, Phase -II मधील सर्व कामांचा आढावा घेता असे दिसून आले आहे की, रस्ते दुरुस्ती / पुनर्बांधणी कामात Sand blanket, Metal, GSB व WMM या थरांमध्ये मोठ्या प्रमाणावर म्हणजेच अगदी 100% इतक्या अनियमितता अनेक रस्त्यांच्या कामामध्ये दिसून येतात. संबंधित दुय्यम अभियंता, सहाय्यक

अभियंता, कार्यकारी अभियंता व उप प्रमुख अभियंता यांना त्यांच्याबाबत निर्देशनास आलेल्या अनियमिततेच्या प्रमाणात Responsibility Dereliction Quotient देण्यात आले आहेत.

शिक्षा प्रदान करतांना संबंधित कर्मचाऱ्यांचा कामाशी संबंधित कालावधी, त्यांच्या अखत्यारित देण्यात आलेल्या रस्त्यांची संख्या या बाबींचा विचार करणे उचित होईल. दोषाचे प्रमाण दर्शविणारी कर्मचारीनिहाय विवरणपत्रे सोबत नस्ती क्र.III मध्ये सादर करण्यात आली आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम ८३(१) मध्ये खालील नमूद जबर शिक्षेची तरतूद आहे:-

1) बडतर्फ करणे

2) महानगरपालिका सेवेतून काढून टाकणे

3) पदावनत करणे अथवा वेतन कमी करणे

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम ८३(३) मध्ये खालील नमूद किरकोळ शिक्षेची तरतूद आहे:-

1) ठपका ठेवणे

2) दंड करणे,

3) महानगरपालिकेच्या नुकसानीची रक्कम वेतनातून वसूल करणे

4) पुढील देय वेतनवाढ/वेतनवाढी ठराविक कालावधीसाठी हंगामी/कायमस्वरूपी परिणामाने रोखून धरणे

त्याचप्रमाणे दोषारोप ठेवलेल्या सेवनिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन नियमावलीच्या सुधारित नियम क्र. 14(अ) (ब) मधील तरतूदीनुसार निवृत्तीवेतन कमी करणे किंवा निवृत्तीवेतनातील काही भाग काढून घेणे, यासारख्या शिक्षा जबर स्वरुपाची शिक्षा या सदरात मोडतात.

**उपरोक्त संपूर्ण विवेचन लक्षात घेता, मान्य असल्यास, या प्रकरणी खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेः-**

'अ' उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे टप्पा-2(Phase-II) मध्ये अनावधानाने दोषारोपपत्र बजाविण्याचे राहून गेलेले कर्मचारी श्री.ए.डी. गव्हाणे, दुय्यम अभियंता व श्री.आर.जी. जाधव, सहायक अभियंता यांच्यावर दोषारोपपत्र बजाविण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल स्वतंत्रपणे 15 दिवसांत सादर करण्यात येईल.

'ब' श्री.विजयकुमार एम. पटेल, सहायक अभियंता व श्री.सुश्रुत वगळ, दुय्यम अभियंता या कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्र बजाविण्यासाठी पाठविले असता, या कर्मचाऱ्यांचे निधन झाले असल्याची बाब निदर्शनास आणण्यात आली. त्यामुळे श्री.पटेल व श्री.वगळ यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोपपत्र वगळण्यात येईल.

टप्पा -1(Phase-I) व टप्पा -2(Phase-II) या दोन्ही टप्प्यात एकूण 84 कर्मचारी सामायिक आहेत. या सामायिक कर्मचाऱ्यांना दोन्ही टप्प्यातील चौकशीअंती वेगवेगळया प्रमाणात शिक्षा होत असल्याचे निदर्शनास येत आहे. तथापि, ही चौकशी एकाच प्रकरणाशी संबंधित होती. त्यामुळे या दोन्ही टप्प्यातील सामायिक कर्मचाऱ्यांना दोन वेळा शिक्षा करणे संयुक्तिक होणार नाही. यास्तव, टप्पा -2(Phase-II) मध्ये शिक्षेचा अंतिम निर्णय घेताना, दोन्ही टप्प्यांपैकी जी शिक्षा जास्त प्रमाणातील असेल ती अंतिम शिक्षा म्हणून अंमलात आणण्यात येईल. 'क'

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अंतिम झालेल्या शिक्षेपैकी ज्या कर्मचाऱ्यांबाबत जबर शिक्षेचे आदेश पारित होतील त्यांच्यावर 'कारणे दाखवा नोटीस' बजावून नियमोचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच ज्या कर्मचाऱ्यांबाबत किरकोळ शिक्षेचे आदेश पारित होतील त्यांच्याबाबत त्वरित शिक्षादेश जारी करून बजाविण्यात येतील. 'ड'

या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांवर बजाविण्यात आलेली दोषारोपपत्रे, त्या अनुषंगाने प्राप्त झालेली अभिवेदने व कागदोपत्री पुरावा हा अभिलेख अवजड स्वरूपाचा असल्याने तो प्रमुख अधिकारी (चौकशी) कार्यालयात परिरक्षीत करण्यात आलेला आहे.

पृ.क्र. टि- वरील 'अ' व 'ब' आणि उपरोक्त 'क' व 'ड' बाबतच्या मान्यतेसाठी व यथायोग्य आदेशासाठी सविनय सादर.

**सोबत:- नस्ती क्र.II (abc) धारिणीत.**

(राजेंद्र रेळेकर) 05.2.18
प्रमुख अधिकारी (चौकशी)

(रमेश बांबळे) 05.2.18
उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी)

(श्री. अजोय मेहता)
मा. महानगरपालिका आयुक्त
महोदय,

Approved as proposed. Separate order is passed indicating punishments commensurate with the dereliction of duty and the deviations observed. Submit report to Hon' Mayor and put report in public domain.

MGC/A/319
23/02/18

Ajoy Mehta

## परिशिष्ट `क`

### कर्मचाऱ्यांनी मांडलेले सामायिक मुद्दे व त्यावरील अभिप्राय

-------

| अनु.क्र. | सामायिक मुद्दा | अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | रस्ते दूरूस्तीचे काम 3 पाळयांमध्ये करावयाची तरतूद होती. परंतु त्यासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध नव्हता. तसेच अनेक रस्त्यांची कामे पाहण्यासाठी अतिशय तुटपुंजा कर्मचारीवर्ग उपलब्ध होता. | ही बाब विचारात घेऊन, P.M.A./TPQA यांची नेमणूक करण्यात आली होती. |
| 2 | मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गठीत झालेल्या शिफारशीच्या अनुषंगाने Standing Technical Advisory Committee (STAC) यांच्या शिफारशीची पार्श्वभुमी लक्षात घेऊन P.M.A./TPQA यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार रस्ते दुरूस्ती कामातील अनियमिततांबाबत संबंधित P.M.A./ TPQA हे जबाबदार आहेत. कर्मचारी जबाबदार नाहीत. संबंधित कामाचे Quality Control, Quality Assurance, Quality Audit याची संपूर्ण जबाबदारी P.M.A. यांची होती. P.M.A. यांनी कंत्राटदाराकडून अंमलबजावणी होत नाही याबाबतचा अहवाल दिला नव्हता. | नियुक्त केलेल्या P.M.A./TPQA हे करीत असलेल्या कामावर संबंधित कर्मचाऱ्यांचे पर्यवेक्षण आवश्यक होते. ज्या-ज्या वेळी Request For Inspection दिली जायची ती P.M.A./TPQA यांच्याबरोबर अभियंता वर्गीय कर्मचाऱ्यांना देखील दिली जात असे. त्यामुळे ते त्यांच्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. |
| 3 | कंत्राटातील अट क्र.5.28.1(a) नुसार खोदकाम केलेले मटेरियल वाहून नेण्यापूर्वी त्याच्या इतर वापराबाबत खातरजमा करावयाची होती. त्यानुसार विभागात कळविले होते. परंतु त्याचे उत्तर प्राप्त झालेले नाही. खोदकाम केलेले मटेरियल 24 | खोदकाम करण्यापूर्वी व्यवस्थितरित्या नियोजन करून याबाबतची विचारणा संबंधित विभागाकडे करणे आवश्यक होते. याबाबत नियोजनाचा अभाव आढळतो. |

| | | |
|---|---|---|
| | तासात वाहून नेणे आवश्यक होते. तसेच खोदकाम केलेले मटेरिअल महानगरपालिकेच्या क्षेपणभूमीवर दिवसा टाकण्यास मनाई होती. सदरचे मटेरिअल क्षेपणभूमीवर टाकण्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे आहेत. कंत्राटातील अट क्र. 5.28.1(a) नुसार कंत्राटदारांना त्यांच्या क्षेपणभूमीवर मटेरिअल वाहून नेण्यासाठी परवानगी दिली जात होती. त्यासाठी संबंधित Item CS-EW-8 व Item CS-EW-8 च्या Quantity महानगरपालिका हद्दीच्या पुढे 20 कि.मी.पर्यंत परिमाणाची तरतूद आहे. | |
| 4 | कंत्राटातील अट क्र.5.28.1(a) मध्ये फक्त रिसीटचा उल्लेख आहे. त्यामुळे त्यात चलनचा समावेश नाही. P.M.A.ने प्रमाणित केलेले परिमाण व खोदकाम नोंदवही यातील तपशील जुळतो. मुंबई हद्दीबाहेरील 20 कि.मी.पेक्षा जास्त अंतराचे अधिदान केलेले नाही. | याच कंडिकेतील अटीनुसार मटेरियल वाहून नेल्याची बाब अभियंत्यांनी प्रमाणित करावयाची आहे. असे करताना त्याबाबतचा फेरीनिहाय अभिलेख म्हणजेच सदर मटेरिअल कोणत्या वाहनाने केव्हा, किती प्रमाणात व कोठे वाहून नेले हा तपशील अधिदानाशी संबंधित असल्याने या पायाभूत अभिलेखाचे काटेकोरपणे परिरक्षीत करणे आवश्यक होते. तसे झालेले दिसून येत नाही. |
| 5 | कंत्राटातील अट क्र.5.28.1 नुसार खोदकाम निर्माण झालेली माती/डेब्रीज ही क्षेपणभूमीवर टाकण्यासंदर्भात संबंधितांना देण्यात येणाऱ्या रॉयल्टीची कागदपत्रे कंत्राटदाराने सादर केलेली नाहीत. | सदर अटीनुसार संबंधित कंत्राटदाराने रस्त्याचे उत्खनन करताना निघालेल्या माती/डेब्रीजच्या प्रमाणात राज्य शासनाकडे रॉयल्टी भरणे आवश्यक आहे व त्याची प्रतिपूर्ती महानगरपालिकेस करावयाची आहे. त्यामुळे हे दायित्व महापालिकेचेही असताना त्याकडे दुर्लक्ष करणे ही बाब समर्थनीय नाही. तसेच याबाबत कंत्राटदाराने किंवा कर्मचाऱ्यांनी कोणती कार्यवाही केल्याचा पुरावा दिसून आलेला नाही. या अभावी खोदकाम झालेली माती, त्याचे वहन याबाबत संदिग्धता निर्माण झाली. |
| 6 | कंत्राटातील अट क्र.5.40 नुसार कंत्राटदाराने अभिलेख परिरक्षीत केलेला आहे व तो चौकशी खात्याकडे | या अटीनुसार कंत्राटदाराने ठेवलेला अभिलेख हा महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कंत्राटानुसार काम सुरू असताना वेळोवेळी तपासून पहावयाचे आहे. यात |

5-75

| | | |
|---|---|---|
| | सादर केलेला आहे. | नमूद तपशीलाच्या खरेपणाची खात्री जर वेळेवर झाली असती तर नंतरच्या टप्प्यावर दक्षता विभागाच्या तपासधीत इतक्या मोठया प्रमाणावर अनियमितता निदर्शनास आल्या नसत्या. |
| 7 | कंत्राटातील अट क्र.5.43.1 व 5.43.2 नुसार कंत्राटदाराने वेब अप्लिकेशन तयार करून सर्व माहिती उपलब्ध करून द्यावयाची होती. तसेच महापालिकेने नोव्हेंबर 2014 पासून SCADA LIVE WORK SOFTWARE हे वेब अप्लिकेशन तयार केले होते. परंतु ते नीट चालत नव्हते. त्यामुळे नंतरच्या स्तरावर मा.महानगरपालिका आयुक्तांनी प्रत्यक्ष पडताळणीवर आधारित अधिदान करण्यास मंजूरी दिली. | हे जरी खरे असले तरी वेब अप्लिकेशन सुरू असताना त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून आलेले नाही. प्रत्यक्ष पडताळणीनुसार अधिदान करावयाचे असल्याने प्रत्यक्ष काम सुरू असताना त्याचा अभिलेख काटेकोरपणे तयार करणे व तपासणे याबाबत कर्मचाऱ्यांवर अधिक जबाबदारी होती. |

(राजेंद्र रेळेकर)
प्रमुख अधिकारी (चौकशी)

(रमेश बांबळे)
उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी)

# परिशिष्ट 'ड'

## I) Formula for Gradation

| Shortfall Percentage | Gradation |
|---|---|
| 0.00% | Y |
| 1% to 25% | A |
| 26% to 50% | B |
| 51% to 80% | C |
| 81% to 99% | D |
| 100.00% | X |

## II) Formula for Granting Responsibility Dereliction Quotient

| Gradation | Responsibility Dereliction Quotient |
|---|---|
| Y | 0 |
| A | 1 |
| B | 2 |
| C | 3 |
| D | 4 |
| X | 5 |

## III) Table Showing No. of Employees placed in various Ranges of Responsibility Dereliction Quotient

| Responsibility Dereliction Quotient | Number of Employees |
|---|---|
| 0 | 1 |
| 0.01 — 0.49 | 5 |
| 0.50 — 0.74 | 14 |
| 075 — 0.99 | 31 |
| 1.02—1.24 | 76 |
| 1.25 — 1.49 | 14 |
| 1.50 — 1.74 | 14 |
| 1.75— 2.00 | 10 |
| 2.01 & Above | 2 |

(राजेंद्र रेळेकर)
प्रमुख अधिकारी (चौकशी)

(रमेश बांबळे)
उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी)

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI

No. Date

## SPEAKING ORDER

The Enquiry Report of the 2nd phase is perused by me. The report has been done after a detailed enquiry consisting both of physical verification on site and also perusal of all relevant documents. The Enquiry Officer has drawn conclusions with respect to quantum of irregularities and fixing responsibility for the same. As in the first report, once again serious irregularities have been noticed. It appears that doing road works not in keeping with the standards had become the norms. Public money has not been put to proper use. Widespread connivance and negligence is seen leading to poor quality roads causing inconvenience to citizens.

There is clearly a case to take serious note of the deviations and send a messsage that this gross criminal waste of public money will not be tolerated and those responsible will be punished. This time also a scientific matrix has been devised to award punishments. The fundamental principle has been to punish those cases with the largest deviations with severe punishment and those lesser in gravity with punishments commensurate with the deviations.

The table shows the employee wise details of deviations from norm noticed as reflected in the Responsibility Dereliction Quotient and the commensurate punishments awarded.

It is seen that there was gap of three to four months from the date of taking trial pits for first phase to the date of starting the work of taking trial pits for second phase. Inspite of this, the quality of work is not improved as in some trial pits taken in second phase, has shown 100% deficiencies. Considering this aspect, the criteria of punishment with respect to Responsibility Dereliction Quotient adopted in Phase I is changed for Phase II as follows:-

| Responsibility Dereliction Quotient | Punishment to be awarded |
|---|---|
| 0.01 to 0.49 | Censure |
| 0.50 to 0.74 | Fine of Rs.10000/- |
| 0.75 to 0.99 | Stoppage of next increment due for a period of one year with temporary effect |
| 1.00 to 1.24 | Stoppage of next increment due for a period of one year with permanent effect |
| 1.25 to 1.49 | Stoppage of next increment due for a period of two years with permanent effect |
| 1.50 to 1.74 | Stoppage of next increment due for a period of three years with permanent effect |
| 1.75 to 2.00 | Reduction in rank for 2 years / Pay to basic of the grade for 2 years during which no increments to be granted |
| 2.01 & above | Removal from service |

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI

PHASE I & II (34+200 ROADS) DESIGNATION WISE COMBINED PUNISHMENT STATUS

| Sr. No. | Punishment to be awarded | Designation of employees | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Dy. Ch.Eng. | Ex. Eng. | Asst. Eng. | Sub Eng. | **Total** |
| 1 | Removal from service | 1 | 0 | 1 | 4 | **6** |
| 2 | Reduction in rank for 2 years during which no increments to be granted | 0 | 1 | 4 | 7 | **12** |
| | Reduction in pay to the basic of the present category for two years during which no increments to be granted. | 0 | 0 | 0 | 11 | **11** |
| 3 | Reduction in pension | 0 | 3 | 0 | 1 | **4** |
| 4 | Stoppage of next increment due for a period of three years with permanent effect | 0 | 2 | 3 | 8 | **13** |
| 5 | Stoppage of next increment due for a period of two years with permanent effect | 0 | 3 | 3 | 11 | **17** |
| 6 | Stoppage of next increment due for a period of one year with permanent effect | 1 | 4 | 14 | 49 | **68** |
| 7 | Stoppage of next increment due for a period of one year with temporary effect | 1 | 3 | 9 | 12 | **25** |
| 8 | Fine of Rs.10000/- | 0 | 1 | 0 | 9 | **10** |
| 9 | Censure | 0 | 0 | 0 | 1 | **1** |
| 10 | Charges to be dropped due to death | 0 | 0 | 1 | 1 | **2** |
| | **Total employees count** | **3** | **17** | **35** | **114** | **169** |